

# Thoughts in a Nutshell


## Laxman Keshav Apte

भावानुवाद : आसावरी काकडे

# Thoughts in a Nutshell

By

Laxman Keshav Apte

**भावानुवाद : आसावरी काकडे**

**बिझिनेस आयकॉन प्रकाशन**

Business Icon

Thoughts in a Nutshell-

By Late Laxman Keshv Apte


भावानुवाद, छायाचित्रे, मुखपृष्ठ : आसावरी काकडे

‘सेतू’ डी१/३ स्टेट बँक नगर कर्वेनगर, पुणे 411052

फोन नं. 9421678480 / 9762209028

ईमेल- asavarikakade@gmail.com

आतील मांडणी : केशव (दिलीप) लक्ष्मण आपटे

फोन नं 9768169056

प्रकाशक : पराग गोरे

बिझिनेस आयकॉन

Business Icon

235/ब/2, परेश अपार्टमेंटस, पर्वती, पुणे -411009

parag@businessicon.in

www.businessicon.in


Mobile : +91 9890040013

प्रकाशन तिथी : २८ आक्टोबर २०२१



या पुस्तकातील लेखन व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

# Nutshell




This nutshell is 20 feet in length, it is 10 hours' work
and it contains 160 cream thoughts,
covering whole of the human life.

शब्द-शिंपल्यात । जपले विचार
सांगितले सार । जीवनाचे..!

# मनोगत

लक्ष्मण केशव आपटे- माझे वडील. ते सतत काहीतरी लिहीत, वाचत असायचे. लेखन स्फुट स्वरूपाचं असायचं आणि वाचन अध्यात्मिक ग्रंथांचं. स्वगत चिंतन केल्यासारखं लेखन. अध्यात्म हाच विषय. बहुतेक लेखन इंग्रजीत होतं. तेव्हा आम्ही भावंडं लहान होतो. त्यांनी लिहिलेलं फारसं कधी वाचायला मिळालं नाही. काही वर्षांपूर्वी अचानक, त्यांनी १९७२ च्या सुमारास कागदाच्या २० फुटी पट्टीवर लिहिलेल्या १६० विचारांची एक गुंडाळी (त्यांनी याला **nutshell** म्हटलंय) मला मिळाली. माझी बहीण प्रतिभा गोरे हिनं ती जपून ठेवली होती. मला खजिना सापडल्याचा आनंद झाला. पण जीर्ण व्हायला लागलेल्या त्या गुंडाळीतले ३६ विचार गहाळ झालेले. हाती लागले ते १२४ विचार मी सलग लिहून काढले. समजून घेण्याच्या प्रक्रियेचा भाग म्हणून मूळ इंग्रजीत लिहिलेल्या विचारांचा अभंग छंदात अनुवाद करण्याचा प्रयत्न केला. नीट समजलेत असं वाटलं त्यातला एकेक विचार आशयाला साजेशा फोटोवर लिहून अभंग छंदातील दोन ओळीत केलेला त्याचा स्वैर भावानुवाद त्याखाली लिहीत गेले. २०१५ साली 'Thoughts in a Nutshell' या ब्लॉगच्या माध्यमातून वडिलांचे हे विचारधन सर्वांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला होता. हाती लागलेल्या विचारधनातून फक्त ७० विचारच मला त्यात घेता आले होते.

त्याचंच ई-पुस्तक करावं असं मनात आलं. त्या निमित्तानं सर्व परत वाचलं तेव्हा जाणवलं की मी केलेला अनुवाद खरंतर त्या कागदी पट्टीवर लिहिलेल्या शब्दांचा आहे. विचारांचा नाही. वडलांचे लिखित विचार समजून घ्यायला याचा उपयोग होऊ शकेल. पण त्यांना काय म्हणायचं आहे ते वाचणाऱ्या प्रत्येकाला वेगवेगळं समजेल. लेखकापासून सुटून होणारं असं विचारमंथन हे त्या लेखनाचं सार्थक असतं. ई-

पुस्तकाच्या माध्यमातून ‘नटशेल’ मधले विचार मुक्त होऊन वाचकांपर्यंत पोचतील आणि या प्रक्रियेला सुरुवात होईल अशी आशा आहे.

‘Thoughts in a Nutshell’ या ब्लॉगचं ई-पुस्तक करण्याच्या दृष्टीनं विचार करताना लक्षात आलं की फोटोंवर लिहिलेली वाक्यं नीट वाचता येत नाहीएत. म्हणून ती आता फोटोंखालीही घेतली आहेत. पाच-सहा वर्षांपूर्वी केलेला भावानुवाद आता परत वाचताना त्यातही काही बदल सुचले ते केलेत. वडलांचा स्वतंत्र परिचय दिला. मिळाले ते फोटोही घातले. या सगळ्यामुळे हे पुस्तक म्हणजे केवळ ब्लॉगचं रूपांतर असं न होता ही एक नवनिर्मिती झाली असं वाटतं आहे.

ई-पुस्तक करायचं तर ठरलं. पण त्यासाठी ब्लॉगची वर्ड फाईल बनवणं मला जमण्यासारखं नव्हतं. ते कौशल्याचं काम माझा भाऊ केशव (दिलीप) आपटे यानं करून दिलं. पुस्तकाच्या दृष्टीनं, आतील आशयाला साजेशी स्क्रिप्टची नेटकी मांडणी करतानाही त्यानं सर्व सहकार्य केलं. विशेषतः फोटोंवर लिहिलेली वाक्यं नीट कळावीत म्हणून फोटोंखालीही घ्यायची असं ठरल्यावर ते लिहिण्याचं मोठं कामही त्यानं केलं. या निर्मिती-प्रक्रियेत माझ्या इतर भावंडांचाही सक्रीय पाठींबा मला मिळत राहिला. आमचा भाचा पराग गोरे यानं प्रकाशकीय नजरेतून काही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यामुळे पुस्तकाची निर्मिती उत्तम होऊ शकली. परागच्या ‘बिझिनेस आयकॉन’ प्रकाशनातर्फे हे ई-पुस्तक प्रकाशित होत आहे याचा विशेष आनंद वाटतो.

हार्दिक सहकार्याबद्दल मी सर्वांची ऋणी आहे.

आसावरी काकडे



**लक्ष्मण केशव आपटे**

**१९२६-१९८०**


## लेखक परिचय-

लक्ष्मण केशव आपटे- आमचे वडील. आम्ही भावंडं त्यांना आप्पा म्हणत असू. त्यांनी स्फूट स्वरूपात भरपूर लेखन केलं. पण ते पुस्तकरूपात प्रकाशित झालं नाही. 'Thoughts in a Nutshell' हे त्यांच्या नावानं प्रकाशित होणारं पहिलंच पुस्तक. त्यांच्या पश्चात चाळीस वर्षांनी प्रकाशित होतं आहे. पुस्तकात लेखकाचा परिचय देतात. तो काय काय आणि कसा द्यावा याचा विचार करत होते. तेव्हाच माझी मोठी बहीण वैशाली लेले हिनं त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या काही आठवणी लिहून पाठवल्या. त्यात त्यांच्या व्यक्तिमत्वाचं थोडक्यात चित्रण झालं आहे. त्यांचा परिचय म्हणून त्यातलाच काही भाग इथं देते-

## बहुआयामी व्यक्तिमत्व ती. आप्पा-

आप्पा एकसारखं काहीतरी लिहित असायचे. आम्हा भावंडानाही लिहायला सांगायचे. असंच एकदा त्यांच्या वाढदिवसाला काहितरी लिहायचं होतं. तेव्हा मी लिहिलं होतं, "आप्पा, तुम्ही तत्त्वज्ञानावर बोलायला लागलात की हिमालयासारखे दिसता. मूडमधे

असलात की आम्हाला जवळ बोलवून हास्यविनोदमय गप्पा मारता तेव्हा खळाळणाऱ्या निर्झरासारखे वाटता. वाचनात गर्क असलात की संथ वाहणाऱ्या नदीसारखे वाटता आणि रागावलात की ज्वालामुखी !!"





वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी एकावर एक ठेवलेल्या सात खुर्च्यांवर शीर्षासन केलं होतं असं आजोबा कौतुकाने सांगायचे. त्यांच्या कसरती बघून सर्कसवाले बोलवायला आले होते म्हणे. पुढे आम्ही लहान असतांना काकांबरोबर आम्हाला एकमेकांकडे टाकून झेलायचे. दिलीप, भास्कर लहान असतांना पायांवर घेऊन अळुंच्यामाळुंच्या करायचे आणि तसेच उडवून पावलांवर बसवायचे.

मोठं झाल्यावर आम्हाला सायकल शिकवत असत. रोजचा पेपर नसायचा पण १९६२ साली चीनशी युद्ध चालू असता इंग्लिश मराठी चार चार पेपर आणायचे. आम्हाला सांगत, दोन्हीकडे बातम्या सारख्या असतात, इंग्लिश पेपर पण वाचा, इंग्लिश सुधारेल.

त्यांनी एक मोठं बाड केलं होतं. त्यात प्रत्येक पानांवर एकेक शब्द लिहून ठेवलेला आणि त्यावर लिहा असं म्हणायचे. असा लेखन संस्कार केला. नगर वाचनालयात घेऊन जायचे. काय वाचावं ते नकळत त्यांच्याकडून शिकायला मिळायचं. खूप हौशी होते. कधीतरी हॉटेलात जाऊ म्हणायचे. एकदा सर्वांना पन्हाळ्याला फिरायला घेऊन गेले होते. त्यांना फोटोग्राफीची कला अवगत होती. खूप फोटो काढले. स्टुडिओही काढला होता काही दिवस. फोटो एनलार्जिंगचं तंत्र अवगत केलं होतं. मनात आलं की कविता करायचे. त्यांच्या कविता वृत्तबद्ध असत. भारतीवर केलेली कविता आठवतेय. 'दुडदुडत चाल ये, बडबडत बोल ये, / गोड हास्यात ये, येई बाळे.' माझ्यावर आधीच

पाठवणी काव्य करून ठेवलेले. कवितांची वही भरलेली. बऱ्याच छापूनही आल्या होत्या. लहर आली की काव्य-गायनही चालायचं.




एकदा पेपरमधे 'राजावार रविवार' असा लेख आला होता. तो वाचून आई म्हणाली, 'कसला आलाय राजावार. त्यापेक्षा पुरूष आपापल्या उद्योगात असतात तेच बरं !' त्यावर आप्पानी 'घातवार रविवार' असा लेख लिहिला आणि तो छापूनही आला. कौतुक झालं. एका पुरुषाने बायकांच्या दृष्टिकोनातून किती छान लिहिलंय म्हणून.

आमच्या आईचं गणित चांगलंय याचं त्यांना कौतुक असायचं. तिला मॅट्रिकला गणितात एक्झमशन मिळालेलं. मी मॅट्रिक झाले तेव्हा आईला म्हणाले बघ, लेक मॅट्रिक झाली, आता तूही हो... आई म्हणाली, मी शिकून काय नोकरी करणाराय? तुम्हीच शिका. आणि खरंच आमच्याबरोबर आप्पांनी कॉलेजात नाव घातलं. केडीसीसी



बँकेतली नोकरी सांभाळून आमच्याबरोबर नियमित कॉलेजला यायचे. रुबाबदार व्यक्तिमत्व, वक्तशीरपणा यामुळं त्यांचा बँकेत आणि कॉलेजात दबदबा असायचा. त्यांचे अकौंटन्सी, इंग्लिश हे विषय उत्तम होते. परीक्षेत सोडवलेले त्यांचे पेपर वर्गात दाखवले जायचे. एवढंच नाही तर कॉलेजच्या सर्व सांस्कृतिक उपक्रमातही ते भाग घ्यायचे. त्यांना वेगवेगळ्या स्पर्धेत अनेक बक्षिसं मिळाली होती. आंतर-कॉलेज निबंध स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी प्रथम क्रमांकाची ढाल कॉलेजला मिळवून दिली होती. बी. कॉम.च्या वर्षाला तर त्यांना बेस्ट स्टुडंट ट्रॉफी मिळाली. पुढं ते एम. कॉम.ही झाले. त्यामुळं बँकेतल्या नोकरीत त्यांना प्रमोशन मिळालं. ब्रँच मॅनेजर म्हणून



पट्टणकोडोलीला बदली झाली. आम्हाला ब्रँच दाखवायला नेलं होतं. पुढे इंटर्नल ऑडिटर झाले. त्या पदावर असतानाच त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली.

ते पट्टीचे पोहणारे होते. एकदा त्यांनी पुरात उडी घेतली होती म्हणे. ते उत्तम बुद्धिबळपटू होते. कॅरम खेळण्यातही तरबेज होते. 'स्टार्ट टू फिनिश' जमायला लागल्यावर त्यांनी कॅरम खेळणं सोडून दिलं. त्यांचं हस्ताक्षर उत्तम होतं. 'मृत्युंजय' कादंबरी वाचून त्यांनी शिवाजी सावंत यांना एक पोस्टकार्ड लिहिलं होतं. त्यातला मजकूर आणि अक्षर इतकं छान होतं की ते पोस्टकार्ड घेऊन शिवाजी सावंत स्वतः आमच्या घरी आले होते. तो प्रसंग चांगला आठवतो. त्यांचं सतत लेखन-वाचन चालू असलं तरी ते आम्हाला विनोद सांगून खूप हसवायचे. त्यांना शाब्दिक कोट्या करायची सवय होती.

असं बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या आप्पांचा सहवास आम्हाला दीर्घ काळ लाभला नाही. ते अवघ्या चोपन्नाव्या वर्षी आम्हाला सोडून गेले. रडू आवरेना... मनात आलं, 'आज गंगा दुथडी भरून वाहते आहे / त्यात आश्चर्य ते काय? गंगा दुथडी भरून वाहणारच / होय आज गंगा दुथडी भरून वाहते आहे.. समुद्राकडून हिमालयाकडे..!'

कालाय तस्मै नमः !

**वैशाली लेले**




## आसावरी काकडे

बी.कॉम., एम.ए. मराठी, एम.ए. तत्वज्ञान

फोन नं. 9421678480 / 9762209028

Email- asavarikakade@gmail.com / Website- www.asavarikakade.com


## प्रकाशित पुस्तके

### कवितासंग्रह-

**मराठी-** 'आरसा'.. 'लाहो', 'मी एक दर्शनबिंदू'.... 'उत्तरार्ध', 'व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर', 'भेटे नवी राई' इ.९ कवितासंग्रह

**हिन्दी-** 'मौन क्षणों का अनुवाद', 'इसीलिए शायद' आणि 'मेरे हिस्से की यात्रा'

**अनुवादित-** 'बोल माधवी', 'तरीही काही बाकी राहील', 'लम्हा लम्हा' आणि 'तू लिही कविता'

**बालगीतसंग्रह-** 'अनु मनु शिरू', 'भिंगोऱ्या भिंग', 'ऋतुचक्र' इ. ५ कवितासंग्रह

### गद्य लेखन-

'कवितेभोवतीचं अवकाश'- **लेखसंग्रह**

'ईशावास्यम् इदं सर्वम्... : **एक आकलन-प्रवास'**

'अथांग'- अथाह या बिंद्या सुब्बा यांच्या मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी **अनुवाद**


'आनंदी गोपाळ'- श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे **संक्षिप्तीकरण.**

**महत्त्वाचे पुरस्कार-**

* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या कवितासंग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार
* एकूण लेखनासाठी गो.नी.दांडेकर स्मृती ‘मृण्मयी’ पुरस्कार
* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार
* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिन्दी निदेशालय, नवी दिल्लीचा हिन्दीतर भाषी हिन्दी लेखक पुरस्कार
* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार


**इतर-**

* इयत्ता सातवी ते एम. ए.पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात वरील संग्रहातील कवितांचा समावेश.
* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलन(२००२) मधे मराठीचे प्रतिनिधित्व.




## Contents


1. Birth
2. Childhood
3. Youth
4. Middle age
5. Old age
6. Death
7. In-between
8. Rebirth
9. Life is a lantern
10. God’s Model
11. Creater
12. Creation
13. Beasts
14. Birds
15. Reptiles
16. Miraculous Seed
17. Germs
18. Insects
19. Earth
20. Water
21. Light
22. Wind
23. Space
24. Absolute
25. Mountains
26. Jungles
27. Philosophy
28. Knowledge
29. Thinking
30. Sleep
31. God in action
32. Super conscious
33. Forbearance
34. Dependence
35. Real world
36. Path of Devotion
37. Knock the door
38. Penance
39. Time
40. When you...
41. Son
42. Sun
43. Evening
44. Morality
45. Indebted we are
46. Book of life
47. Grief
48. Anxiety
49. Experience
50. Inner voice
51. Craving for
52. Concentration
53. Loneliness
54. Food is scarce
55. Clothing
56. Religions
57. Duality
58. Individual
59. Breath
60. On foot if you go
61. Visible God
62. Moon
63. The active Universe
64. Sky is blue..
65. Until you merge
66. The perennial joy
67. Prompter
68. Subsistence
69. Guided world
70. Liberation

# 1 Birth




BIRTH in human form is last step towards God.

जन्माचे पाऊल । सान तिच्यापुढे
प्रौढ 'त्याच्या'कडे । निघालेले


# 2 Childhood




Childhood: preparatory period of wrong doings.


बाल्यावस्था असे । प्रारंभ चुकांचा
पाया आयुष्याचा । घडे तेव्हा!..

## 3 Youth




Youth is capable- it can be wasted.
It can be utilized for betterment.

तारुण्य सक्षम | उधळता येते
जतनही होते | भल्यासाठी..!




# 4 Middle age




Middle age is a pause. It is beginning of wisdom and commencement of foolishness.

माध्यान्ह विसावा । नवी सुरुवात
असे नेणीवेत । शहाणीव...


## 5 Old age




Old age is reminder of the travel into the space

पानगळ देई । स्मरण यात्रेचे
आता विरायचे । अनंतात..!


# 6 Death




Death is endurance in the Green Room.

रिता रंगमंच । वाट पाहतोय
प्राण तिष्ठतोय । विंगेमध्ये..!


# 7 In-Between




Between death and rebirth- is a travel with a bundle of desires in search of another body.

मृत्यू ते जन्म हा । कामना-प्रवास
चालला सायास । देहासाठी..!


## 8 Rebirth




Rebirth - is another imprisonment.

महाभूते देती । देह, मुक्त जीवा
नवा जन्म, नवा । कारावास..!

## 9 Life is a lantern




Life is a lantern between dark and dark!

ऐल पैल तम । असीम अनंत
मधे चंद्रज्योत । आयुष्याची..!

# 10 God’s model




Man is model of God.


जीवसृष्टीमध्ये । प्रजाती अनेक
माणूस प्रतिक । ईश्वराचे..!

## 11 Creator





Creator is capricious spendthrift.

कसा हा निर्माता । उधळतो मुक्त
स्वयंभू, अलिप्त । असूनही..!



## 12 Creations




Creations are bubbles of one great thought.


विश्व साकारले । संकल्पामधून
तरंग होऊन । खेळणारे..!

# 13 Beasts




Beasts are better because they can
bear insult in a way better than man can do

माणसापरास । म्हणे प्राणी बरे
साहतात सारे । सहजीच..!




# 14 Birds




Birds can fly in the air but alas !
They cannot remain there.

आकाश केवळ । वाट उड्डाणाची
सोय जगण्याची । धरेवर..!


## 15 Reptiles




Reptiles are earth scrapers,
living on the air but cannot fly in it.

वारुळांचे घर । पवन प्राशिती
उडण्याची गती । नाही त्यांना..!

## 16 Miraculous seed




Man is the only miraculous seed, which when buried partly sprouts – out in another human form.

माणसाचे बीज । विस्मयकारक
उपजते एक । नवी व्यक्ती..!


# 17 Germs




Germs - are atoms of life

जीवसृष्टीतील । कीटक किटाणू
अणू परमाणू । चैतन्याचे..!

## 18 Insects




Insects tell you that life is
so insignificant not worthy of living

जगावेसे काही । नाही जीवनात
सार सांगतात । कीटक हे..!


## 19 Earth




Earth is there because space is there.

आदितत्त्व जरी । असे शून्याकार
पृथ्वीला आधार । अवकाश..!

# 20 Water




'when you happen to pass by an expanse of water
sit for a while for meditation'

जलाशयापाशी । ध्यानाला बसावे
शल्य निरवावे । नादब्रह्मी..!


# 21 Light




When you will see light in the darkness
success is sure.

निबिड तमात । दिसता प्रकाश
यशाचे आकाश । येई हाती..!

## 22 Wind





Wind flows and sun shines because they are afraid of God. Why shouldn't we?

ईश्वर-धाकाने । वायु, सूर्य भ्रमे
आपण का कर्मे । टाळावीत..?


---

# 23 Space




(Space) vacuum is the only simile
for all pervading God.

आकाश-पोकळी । एकच उपमा
ईश्वराच्या धामा । समर्पक..!




# 24 Absolute





Of the one Absolute we are a segment..

नित्य, पूर्ण, एक । अखंड निर्गुण
आपण सगुण । अंश त्याचे..!




## 25 Mountains





Mountains are rent free houses
where no one dares to dwell

पर्वत पठारे । मोफत निवास
कोणाला धाडस । राहण्याचे?




## 26 Jungles





Jungles are full of life without a nurse or a doctor!

गर्द वनराई । चैतन्याचा स्रोत
वैद्याची सोबत । नसताना..




# 27 Philosophy




Philosophy has answer to
any and every of your questions.

साऱ्यांची उत्तरे । तत्त्वज्ञानापाशी
परंतू हाताशी । प्रतिबिंब..!


## 28 Knowledge




Knowledge of things about- care not much.
Knowledge of things within- mind them most.

असो मनाआड । भोवतीचे रान
आतले सामान । आवरावे..!


# 29 Thinking




Thinking for years together teaches us to cease thinking and commence meditations.

विचारांच्या सीमा । विचारां कळती
परतून होती । ध्यानमग्न..!

## 30 Sleep




Sleep is short period death. It is recharging, it is returning to one's self for brief span of time.

झोप- छोटा मृत्यु, | स्वरूपा भेटणे
आणि परतणे । नव्या जन्मी..!

## 31 God is in action




When you are awake God is in action.


कर्मयोग ‘त्याचा’ । अखंड चालला
सजग मनाला । आकळतो..!

## 32 Super conscious..





Super conscious state of mind
is magnifying our tiny self.

आत्मलीन स्थिती । पाहते स्वरूप
जणू विश्वरूप । पाहतेय..!




# 33 Forbearance




Forbearance is capital which teaches independence.

मागणे न काही । फुलायचे फक्त
असायचे मुक्त । अंतर्बाह्य..!



## 34 Dependence




Dependence teaches the importance of Independence.

आधाराशिवाय । कसे उमगेल
स्वतंत्र्याचे मोल । सामर्थ्याला..!


## 35 Real world




Beyond Retina lies the real world.

सत्यरूप विश्व । दृष्टिच्या पल्याड
पाहणे अल्याड । घोटाळते..!


# 36 Path of Devotion




Path of devotion is a path which can be followed by a layman. When he reaches, he becomes He.


भक्तीमार्ग सदा । खुलाच असतो
भक्त देव होतो । पोचे तेव्हा..!

## 37 Knock the door..





Knock and door will be opened to you for entrance if you are then alive to enter. Because life is too weak and meek to institute a concussive blow.

वाजवून पाहा । उघडेल दार
दिरंगाई फार । होऊ नये..!
पुन्हा वाजवाया । असेल नसेल
क्षीण नि मृदुल । जीवन हे..!




# 38 Penance




Penance - tiresome job but everyone does it.

आत्मक्लेष एक । अटळ वेदना
पण ती चुकेना । कोणालाही..!




## 39 Time




Time has no measure still we say this is
4th day of June, 1972

काळ एक मिती । अनादी अनंत
तरी मोजतात । दिस-मास..!


## 40 When you..




When you reach moon you see another ridiculously smiling still farther away.

पोचा चंद्रावर । दुसरा दिसेल
दुरून हसेल । मिष्किलसा..!


# 41 Son




Son - guarantee of survival after death.

मृत्यु येण्यापूर्वी । बीज उगवते
फिरत राहाते । जीव-चक्र..!

## 42 Sun




Sun sheds tears when he sees a shade.

सूर्य ढाळी अश्रू । सावली पाहून
माध्यान्हीचे ऊन । झाकोळले..!


# 43  Evening




Evening is a tangent meeting.


दिवस-रात्रीच्या । मध्यसीमेवर
सांध्य-हुरहुर । प्रस्थानाची..!

## 44 Morality




Morality is like a flower, difficult to maintain afresh continuously for a long time.

आदर्श दिसती । सुमनांसारखे
कठीण राहणे । ताजे नित्य..!



# 45 Indebted we are




Indebted we are born and so shall we die.


जन्मजात ऋणी । असतो आपण
तसेच मरण । ठरलेले..!

## 46 Book of Life




Joy is the cover but inside all sorrow
such is book of life.

वरती आनंद । आत सारे दुःख
असे हे पुस्तक । जीवनाचे..!




## 47 Grief





Grief is joy spoiled..!

पार्थिव आनंद । क्षणात विरतो
दुःख पांघरतो । दीर्घकाल..!



## 48 Anxiety




Anxiety is useless man's job


रिकाम्या मानाला । चिंता पोखरते
विस्कटून जाते । पाहणेच..!

# 49 Experience




Experience is best teacher.

जगताना रोज । धडे मिळतात
शिक्षक होतात । अनुभव..!



# 50 Inner voice





Your inner voice is your best guide.

आतला आवाज । हाच खरा मित्र


असतो सर्वत्र । सोबतीला..!

## 51 Craving for




Craving for one thing continuously is half getting it.

अखंड ध्यासाला । वाट सापडते
यश सवे येते । चालताना..!



# 52 Concentration




High concentration is madness.

भान हरपेल । अशी एकाग्रता
मनाला पेलता । येत नाही..!

## 53 Loneliness




In loneliness God speaks with you.

कोलाहलमुक्त । एकांताच्या घरी
बोलावया हरी । अवतरे..!

# 54 Food is scarce




Food is scarce, because everyone overeats.


प्रत्येकाला जर । हाव अनावर
दुष्काळाचा भार । पडणार..!

# 55 Clothing




A rose needs no covering, why should you?

गुलाब असतो । अंतर्बाह्य मुक्त
आपण विमुक्त । का न व्हावे?



# 56 Religions




Religions are trees in one park.


विवेकतरुंची । मुळे जरी भिन्न
एकच उद्यान । सर्वांसाठी..!

# 57 Duality




Duality is seen when eyes are open.

पार्थिवात बद्ध । पार्थिव दृष्टिला
व्दैताचीच लीला । दिसणार..!




## 58 Individual




Individual is expression of God.

नाद गंध रूप । असो कोणतेही
ईश्वराची सही । सर्वावर..!


## 59 Breath




Breath- you do not breathe, someone makes you breathe. So credit of all actions in life goes to him. Because unless breath is there you can't do anything.


कुणीतरी आत । नित्य श्वास घेते
श्रेय त्याला जाते । उड्डाणांचे..!

## 60 On Foot if you go..




On foot if you go, world will take you on head.

आतून निरिच्छ । त्यालाच लाभते
सारे जग घेते । डोक्यावर..!



## 61 Sun is visible God..




Sun is visible God. But no one can look at him.

दिसणारा देव । एकमेव सूर्य
पण कोणा धैर्य । पाहण्याचे?..!

# 62 Moon




Moon is pleasing when she is full- fool!

चंद्रिका मोहक । जेव्हा पूर्ण, वेडी
प्रकाश-कावडी । ओसंडते..!


# 63 This active Universe




This active universe is a single thought of god.


चराचर विश्व । नित्य नवा खेळ
संकल्प केवळ । ईश्वराचा..!

## 64 Sky is blue-





Sky is blue- a false statement.

आकाश निळे हे । चुकीचे विधान
उगा समाधान । नजरेचे




## 65 Until you merge..





Until you merge, distance will not disappear.

'मी'पण विरता । अंतर सरेल
केवळ उरेल । 'असणे'च..!




## 66 The perennial joy




The perennial joy comes when grief will not dare to knock your door.


दार वाजवाया । घाबरेल दुःख
तेव्हा नित्य सूख । प्रवेशेल..!

# 67 Prompter...




Without prompter there can be no performance.

बोलवित्याविना । सारे खोळांबेल
जागीच थांबेल । विश्वनाट्य..!



## 68 Subsistence




Subsistence is God guaranteed.

निर्वाहाची हमी । म्हणे देव घेतो
चोचीसवे देतो । दाणे सुद्धा..!

## 69 God guided world..




No judge is necessary for this God guided world.


ईश-दिग्दर्शित । आखीव विश्वाला
परीक्षक भला । कोण हवा?

# 70 Liberation




Liberation comes when dry theoretical knowledge is experimented upon successfully.

मुक्तीच्या पायऱ्या । समोर दिसती
‘शब्दां’ची प्रचिती । येते तेव्हा..!



## Few thoughts from Nutshell



Life is a lantern between dark and dark!

Man is model of God.

Creator is capricious spendthrift.

Creations are bubbles of one great thought.

Space is the only simile for all pervading God.

Of the one Absolute we are a segment

Philosophy has answer to any and every of your questions.

Knowledge of things about- care not much. Knowledge of things within- mind them most.

Thinking for years together teaches us to cease thinking and commence meditations.

****

Business Icon